प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

जून 26, 2019

**वैध चलन म्हणून जनता सर्व नाण्यांचा स्वीकार करु शकते – आरबीआय.**

भारत सरकारने टाकसाळीत पाडलेल्या नाण्यांचे प्रसारण भारतीय रिझर्व्ह बँक करत असते. जनतेची गरज भागविण्यासाठी, नवीन मूल्यातील नाणी व निरनिराळया विषयांवरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक नवीन डिझाईन्स असलेली नाणी वेळोवेळी दिली जात असतात. नाणी ही अधिक कालावधीदरम्यान प्रसारात राहत असल्याकारणाने, निरनिराळया आकारांची व डिझाईन्सची नाणी एकाच वेळी प्रसारात/व्यवहारात येत असतात. सध्या, 50 पैसे, रु.1/-, 2/-, 5/- व 10/- मूल्याची निरनिराळया आकारांची, विषयांची व डिझाइन्सची नाणी प्रसारात आहेत.

असे समजण्यात आले आहे की, काही क्षेत्रात/बाबतीत ह्या नाण्यांच्या खरेपणाविषयी शंका असल्याकारणाने, ही नाणी स्वीकारण्यास व्यापारी, दुकानदार व जनताही हयगय करते. ह्यामुळे देशाच्या काही भागात ह्या नाण्यांच्या मुक्त उपयोगावर व प्रसारणावर विपरीत परिणाम झाला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक जनतेला विनंती/आवाहन करते की त्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये आणि कोणतीही हयगय न करता, त्यांच्या सर्व व्यवहारांमध्ये, ही नाणी, एक वैध चलन म्हणून स्वीकारणे सुरु ठेवावे. भारतीय रिझर्व्ह बँकेने डीसी एम (एनइ) क्र.जी-2/08.07.18/2018-19 जुलै 2, 2018 रोजी व जानेवारी 14, 2019 रोजी अद्यावत केलेल्या सूचनांनुसार, ही नाणी व्यवहारांमध्ये स्वीकारण्यासाठी व बदलून देण्यासाठी बँकांना पुनश्च कळविले आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2018-2019/3056**